म्हाडा
MHADA

प्रति,
श्री / श्रीमती / कु.

ARUN JAGANNATH BORKAR

BHAMBREKAR NAGAR OPP PLOT NO 51
INDUSTRIAL ESTATE ROAD KANDIVALI W
BOMBAY 400067

1473 3/7/91
जा. क्र. / उ. स. नं. ३ / जावँप्र /
उपसंचालक नं. ३ यांचे कार्यालय,
जागतिक बँक प्रकल्प,
चारकोप, कांदिवली (प.),
मुंबई - ४०० ०६७.

विषय :- बोरीवली (प), कांदिवली (पू) व (प) व अंधेरी (प) येथिल अ, ब, क, ड प्रकारच्या विकसित भूखंडाच्या वितरणा बाबत (कोड क्र. ०११ व ०१२.)

संदर्भ :- आपला अर्ज क्र. ACGP- 44280 प्राथमिक सोडतीतील अनुक्रमांक 7479

महोदय / महोदया,

भूखंड वितरणाच्या प्राथमिक सोडतीत आपल्या यशस्वी झालेल्या अर्जाची छाननी करून पात्रता निश्चित करण्या करीता आपण अर्जात व प्रतिज्ञापत्रात नमूद केलेल्या माहितीच्या पुष्टयर्थ खाली दर्शविलेली कागदपत्रे दि. 20-08-91 रोजी 10 AM वाजता खालील पत्यावर अर्जदाराने समक्ष सादर करावीत. दिलेल्या दिवशी कागदपत्रे सादर न केल्यास आपला अर्ज रद्दबातल करण्यात येईल. या संदर्भात अर्जासोबत दिलेल्या माहिती पुस्तिके मधील परिच्छेद क्रमांक ५, ६ पहावेत.

१. आपले वय सिध्दकरण्याकरीता जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला इत्यादी.

२. आपल्या सध्याच्या निवासी जागेची इमारत मालकाने / गृहनिर्माण संस्थेने तिच्या भाडेकरूच्या / सभासदाच्या नावें दिलेली माहे जून १९९० ची प्रमाणित भाडेपावती तसेच आपले व आपल्या कुटुंबियांची नावें असलेली शिधावाटप पत्रिकेची प्रमाणित प्रत.

३. माहे जुलै १९८९ ते जून १९९० या बारा महिन्यातील (पती/पत्नी दोघांच्याही) उत्पन्नाचा पुरावा. (असा पुरावा अर्जासोबत दिलेल्या माहिती पुस्तिकेच्या पृष्ठ क्र. ३० व ३१ वर दिलेल्या विहित नमुन्यातच सादर करावा. या नमुन्याच्या प्रती सोबत जोडल्या आहेत. जे अर्जदार स्वतः व्यवसाय करीत असतील अश्या अर्जदाराने उत्पन्ना बाबत करावयाच्या प्रतिज्ञा पत्रात (AFFIDAVIT) आपले जुलै १९८९ ते जून १९९० या बारा महिन्याचे सरासरी उत्पन्न दर्शवावे.

४. वास्तव्याच्या 'अ' गटाकरीता अर्ज केला असल्यास आपले मुंबई महानगर प्रदेशातील / वास्तव्याच्या 'ब' गटाकरीता अर्ज केला असल्यास मुंबई महानगर प्रदेशासह महाराष्ट्रातील १ जुलै १९७० ते ३० जून १९९० या २० वर्षात १५ वर्षापेक्षा जास्त काळ वास्तव्य सिध्द करणारा कागदोपत्री पुरावा सादर करावा (या करीता ग्राह्य असलेला पुरावा माहिती पुस्तिकेच्या पृष्ठ क्रमांक ६ वर दिलेला आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे.)

५. अनुसुचित जाती व नवबौध्द, अनुसुचित जमाती, विमुक्त जमाती व भटक्या जमाती या प्रवर्गात मोडणाऱ्या अर्जदारांनी कार्यकारी दंडाधिकारी (विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांचे नव्हे) यांचे प्रमाणपत्र सादर करावे.

उत्पन्नाबाबतचे दाखले / प्रतिज्ञापत्रे मुळ स्वरुपात सादर करावीत. **इतर कागदपत्रांच्या प्रमाणित झेरॉक्स प्रती मुळ कागदपत्रें दाखवून सादर कराव्यात.**

प्राथमिक सोडतीत यशस्वी झालेल्या सर्व अर्जदारांना विकसित भूखंडाचे वितरण मिळेलच याची खात्री देता येणार नाही. वर दर्शविलेली सर्व कागदपत्रे सादर केल्यानंतर या कागदपत्रांच्या आधारे अर्जाची पूर्णपणे छाननी करुन अर्जदाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. अशा पात्र अर्जदाराना अनामत रकमेचा भरणा रोखीने करावा लागेल. पात्र ठरलेल्या व अनामत रकमेचा भरणा केलेल्या अर्जदारांमधूनच अंतिम सोडत काढण्यात येईल व अंतिम सोडतीतील अग्रक्रमाने उपलब्ध विकसित भूखंडाचे वितरण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

आपली विश्वासू,

उपसंचालक (३) / जागतिक बँक प्रकल्प

**कागदपत्रे खालिल पत्यावर सादर करावीत.**

जागतिक बँक प्रकल्पाचे कार्यालय (साईट ऑफिस),
सह्याद्री नगर जवळ, चारकोप जागतिक बँक प्रकल्प, कांदिवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०६७.

*कांदिवली (पश्चिम) रेल्वे स्थानक येथून बस क्रमांक २७१ व २८६ बसने सह्याद्री नगर या बस थांब्यावर उतरणे.*